N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** राहाता
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0363 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/09/2025 00:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 24/09/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/09/2025
**Time From (वेळेपासून):** 20:19 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/09/2025 **Time (वेळ):** 00:29 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/09/2025 00:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** राहाता

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): फरीयाद उर्फ गुड्डु फिरोज शेख

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | श्रीरामनगर,शिर्डी ताराहाता,जि,राहाता ,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | श्रीरामनगर,शिर्डी ताराहाता,जि,राहाता ,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9096552457

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल रामनाथ गवांदे | | | 1. रापोखरी हवेली,तासंगमनेर, जिअ,राहाता ,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

राहाता,जि.- अहिल्यानगर दि. /09/2025.

मी फरीयाद उर्फ गुड्डु फिरोज शेख,वय-33 वर्षे,व्यवसाय-खडी,मुरूम व वाळु वाहतुक,रा.श्रीरामनगर,शिर्डी ता. राहाता,जि.अहिल्यानगर,मो.नं. 9096552457

समक्ष फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणचा रहिवाषी असुन खडी,मुरूम व वाळु वाहतुकिचा व्यवसाय करतो. मी दि. 24/09/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर यांना फोन करून मला एक लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असलेबाबत तक्रार सांगितली.त्यावेळी पोनि श्री.आल्हाट यांनी मला राहाता येथे सुरक्षित ठिकाणी उपस्थित राहण्यास सांगितले. त्यानुसार दि.24/09/2025 रोजी सायंकाळी 05/00 वाजेचे सुमारास मी थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर चे अधिकारी व कर्मचारी आले. सदर ठिकाणी पोनि श्री.आल्हाट यांनी माझा तसेच माझेसोबत हजर असलेला माझा मित्र दिपक जयवंत गडाख यांचा परिचय करुन घेतला तसेच आम्हाला त्यांचा व त्यांचेसोबतचे स्टाफ, दोन षासकीय पंचाचा परिचय करुन दिला.

त्यानंतर मी पोनि श्री.आल्हाट यांचे सुचनेवरुन षासकीय वाहनात बसलो व दोन षासकिय पंचासमक्ष तक्रार सांगितली की," मी अतुल जगताप,रा.तळेगाव,संगमनेर यांचेकडुन आयषर कंपनीचे डंपर वाहन क्रमांक एम एच 17, सी.व्ही.2499 खरेदी केले होते. डंपर खरेदी बाबतचा मी अतुल जगताप यांचेसोबत दिनांक 26/08/2025 रोजी नोटरी करारनामा केलेला आहे व डंपरच्या खरेदीची संपुर्ण रक्कम अतुल जगताप यांना दिल्यानंतर ते सदरचे डंपर वाहन माझ्या नावावर करणार आहे. मी खरेदी केलेला डंपर हा खडी, मुरूम तसेच वाळु वाहतुकीसाठी वापरत आहे व रॉयल्टी असणा-या खडी क्रशर ठिकाणावरून मी खडी घेवुन षिर्डी तसेच राहाता परिसरात वाहतुक करत आहे. दिनांक 18/09/2025 रोजी संगमनेर येथील खडी क्रषरवरच्या ठिकाणाहुन खडी भरून षिर्डीकडे येत असताना राहाता येथील गितगंगा हॉटेल जवळ राहाता पोलीस स्टेशनचे पी आय चव्हाण साहेब व गवांदे पोलीस यांनी माझे डंपर वाहन अडवुन गाडीची कागदपत्रे तपासुन डंपरमध्ये जास्तीची खडी भरलेली असल्याचे सांगुन गाडी राहाता पोलीस स्टेशन येथे घेण्यास सांगितली. त्यावेळी मी त्यांना खडीच्या रायल्टिची सर्व कागदपत्रे दाखवली तरी देखील त्यांनी डंपर मध्ये जास्तीची खडी भरलेली असल्याचे सांगुन डंपर वाहन कारवाई साठी पोलीस स्टेषन मध्ये घेवुन येण्यास सांगितले.त्यानंतर पी आय साहेब हे त्या ठिकाणावरून निघुन गेले त्यानंतर मी गवांदे पोलीस यांना डंपर सोडण्यसाठी विनंती केली त्यावेळी गवांदे पोलीस मला म्हणाले कि, तुम्ही खडी बरोबर वाळुची वाहतुक पण करता त्यामुळे पी आय साहेब यांना महिन्याचा मीटर चालु करावा लागेल त्यानंतर तुम्ही खडीची तसेच वाळुची वाहतुक करू शकता त्यासाठी तुम्ही उदया मला येवुन भेटा मी तुम्हाला पुढं कस करायचं ते सांगतो असे म्हणुन माझे डंपर वाहन सोडुन दिले.त्यानतर दिनांक 21/09/2025 रोजी गवांदे पोलीस यांनी मला फोन करून राहाता येथील भडांगे चहा स्टाल चे जवळ बोलावुन घेवुन सांगितले कि,राहाता पोलीस स्टेशन हद्दिमध्ये खडी तसेच वाळुची वाहतुक करायची असेल आणि डंपरवर कारवाई करायची नसेल तर मला व पी आय चव्हाण साहेबांना मिळुन दर महिन्याला 20,000/- रूपये दयावे लागतील.त्यावेळी माझ्या लक्षात आले कि,गवांदे पोलीस हे माझे डंपर वाहनाने राहाता पोलीस स्टेषन हद्दिमध्ये वाळुची व खडीची वाहतुक करण्यासाठी पी आय साहेब यांचेकरीता तसेच स्वतःकरीता 20,000/- रूपये लाचेची मागणी करत आहे व मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी गवांदे पोलीस यांना म्हणालो कि, मला एवढे पैसे दयायला जमणार नाही.मी तुमची नंतर भेट घेवुन सांगतो असे म्हणुन तेथुन निघुन आलो.आज रोजी माझा मित्र दिपक जयवंत गडाख यांचे मोबाईल क्रमांकावरून गवांदे पोलीस यांना भेटण्यासाठी

संपर्क केला होता त्यावेळी त्यांनी मित्र दिपक गडाख याला सोबत घेवुन राहाता पोलीस स्टेषन येथे भेटण्यास बोलावले आहे. आज रोजी मी व माझा मित्र दिपक गडाख असे राहाता पोलीस स्टेषन येथे जावुन गवांदे पोलीस यांची तसेच त्यांचे मार्फतीने पी आय साहेब यांची भेट घेणार आहे व त्यांचे सोबत खडी तसेच वाळु वाहतुकीबाबत चर्चा करणार आहे. त्यावेळी गवांदे पोलीस तसेच पी आय साहेब यांनी माझ्या डंपर वाहनाने वाळु तसेच खडी वाहतुक करण्यासाठी व डंपरवर कारवाई न करण्यासाठी दर महिन्याला 20,000/- रूपये लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी." अषी तक्रार सांगितली.पोनि आल्हाट यांनी सांगितल्याप्रमाणे तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन दिली.त्यावर मी,दोन्ही पंचांनी व पोनि श्री.आल्हाट यांनी स्वाक्षरी केली.

त्यनंतर माझ्या तक्रारीवरुन लोकसेवक गवांदे पोलीस यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी लाचमागणी व पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असलेबाबत कळवून त्याच्या वापराबाबत मला,पंचांना व मित्र दिपक गडाख यांला माहिती समजावून सांगितली.पोनि श्री.आल्हाट यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून,त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्डर नसल्याची माझी,दोन्ही पंचांची व मित्र दिपक गडाख यांची खात्री करून दिली.त्यानंतर पोनि श्री.आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी पोनि श्री.आल्हाट,दोन्ही पंच,मित्र दिपक गडाख व मी असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकॉर्डर केले. त्यानंतर पोनि श्री.आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत मला,पंच नं.1 व मित्र दिपक गडाख यांना सुचना समजावुन सांगितल्या.त्यानंतर लोकसेवक गवांदे पोलीस हे राहाता पोलीस स्टेषन येथे आल्यानंतर फोन करणार असल्याचे मी पोनि श्री.आल्हाट यांना कळविले त्यावेळी लोकसेवक गवांदे पोलीस यांचा फोन येण्याची वाट पाहण्याचे सर्वानुमते ठरले त्यानंतर बराच वेळ झाला लोकसेवक गवांदे पोलीस यांचा फोन न आल्याने लोकसेवक गवांदे पोलीस यांना फोन करण्याचे ठरले.त्याप्रमाणे पोनि श्री.आल्हाट यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे माझ्या 9096552457 या मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक गवांदे पोलीस यांच्या 8459282870 या मोबाईल क्रमांकावर संध्याकाळी 06/29 वा.चे सुमारास फोन करून मोबाईल फोनचा स्पिकर ऑन करून त्यांना कुठे आहे असे विचारले असता त्यांनी लोणीत असल्याचे सांगुन दहा ते पंधरा मिनिटांमध्ये येतो असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना आल्यावर कॉल करा असे सांगुन फोन कट केला.सदर कॉल दरम्यान माझेत व लोकसेवक गवांदे पोलीस यांचेत झालेले संभाशण पोनि श्री.आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्डरड करून घेतले. त्यानंतर बराच वेळ झाला तरी लोकसेवक गवांदे पोलीस यांचा फोन न आल्याने पुन्हा त्यांना कॉल करण्याचे ठरले त्याप्रमाणे पोनि श्री.आल्हाट यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे माझ्या वरील मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक गवांदे पोलीस यांच्या वरील नमुद मोबाईल क्रमांकावर कॉल करून मोबाईल फोनचा स्पिकर ऑन करून लोकसेवक गवांदे पोलीस यांचे सोबत बोलणे केले असता त्यांनी पोलीस स्टेषनला असल्याचे सांगितले त्यावेळी मी त्यांना सोबत मित्र दिपक गडाख असल्याचे सांगुन कुठे येवु असे विचारले असता त्यांनी पोलीस स्टेषन मधील ते बसत असलेल्या केबीन मध्ये येण्यास सांगितले व फोन कट केला.सदर कॉलमधील संभाशण पोनि श्री.आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डरच्या सहायाने रेकॉर्डर केले. त्यानंतर लोकसेवक गवांदे पोलीस यांनी सांगितल्या प्रमाणे त्यांची राहाता पोलीस स्टेषन येथे त्याचे केबीन मध्ये भेट घेण्याचे ठरले.त्यानंतर पोनि श्री. आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे गळयात कोणास दिसणार नाही अषाप्रकारे अडकवुन दिला.पोनि श्री.आल्हाट यांचे सुचने प्रमाणे मी पंच नं.1 व मित्र दिपक गडाख यांचेसह माझेकडील चारचाकी वाहनाने लोकसेवक गवांदे,पोलीस यांची भेट घेण्याकरीता राहाता पोलीस स्टेषन येथे रात्री 20/19 वा.चे सुमारास रवाना झालो.

मी, पंच नं. 1 व मित्र दिपक गडाख असे राहाता पोलीस स्टेषन येथे जावुन लोकसेवक गवांदे पोलीस यांची भेट घेतली. त्यावेळी लोकसेवक गवांदे पोलीस यांचेत व माझेत माझे वाहनासंबंधी चर्चा झाली. त्या चर्चेदरम्यान गवांदे यांनी त्यांचे स्वतःकरीता व पी आय साहेब यांचेकरीता असे मिळुन माझेकडे 20,000/- रूपये लाचेची मागणी केली व त्यापैकी 15,000/- रूपये पहिल्या टप्प्यात स्विकारण्याचे मान्य करून उर्वरित रक्कम एक ते दोन दिवसांनी देण्यास सांगितली. मी त्यांना उदया देवुन टाकतो असे म्हणालो असता लोकसेवक गवांदे ठिक आहे असे म्हणाले त्यानंतर मी पंच नं.1 यांचेसह सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 20/47 वा.चे सुमारास परत आलो. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी माझ्या ताब्यातील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला.

त्यांनतर मी व पंच क्र.1 यांनी वरील घडला प्रकार पोनि आल्हाट यांना पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितला तसेच पोनि श्री.आल्हाट व दोन्ही पंचांनी व्हॉईस रेकॉर्डर मधील रेकॉर्डरड झालेले संभाशण ऐकले असता लोकसेवक गवांदे,पोलीस यांनी माझेकडे त्यांचे स्वतःकरीता व पी आय साहेबांकरीता 20,000/- रूपये लाचेची मागणी करून त्यापैकी 15,000/- रूपये पहिल्या टप्प्यात स्विकारण्याची तयारी दर्षवल्याचे निष्पन्न झाले. तसेच लोकसेवक गवांदे पोलीस यांना मी लाचेची रक्कम कमी करण्यासाठी भेट घालुन देण्याची विनंती केली असता त्यांनी मला उभा करणार नाही असे म्हणुन भेट घालुन देण्यास नकार दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

लोकसेवक गवांदे,पोलीस यांचे भेटीदरम्यान त्यांना उदया भेट घेणार असल्याचे सांगितल्याने दिनांक 25/09/2025 रोजी लोकसेवक गवांदे,पोलीस यांचे विरूध्द सापळा कारवाई करण्याचे ठरले.त्याप्रमाणे पोनि आल्हाट यांनी मला दिनांक 25/09/2025 रोजी राहाता येथील सुरक्षित ठिकाणी 11/00 हजर राहण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी दिनांक 25/09/2025 रोजी 11/00 वा.चे सुमारास राहाता येथे सुरक्षित ठिकाणी हजर असताना पोनि श्री.आल्हाट सापळा पथकासह सुरक्षित ठिकाणी हजर झाले. त्यानंतर लोकसेवक गवांदे,पोलीस यांचे विरूध्द लाचेचा सापळा लावण्याचे ठरले.लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 15,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा,अशी रक्कम हजर केली.पोनि आल्हाट यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पो.कॉ.वाघ यांनी करून दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली,एका को-या कागदावर त्या नोटाचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर लाच रक्कम लोकसेवक गवांदे,पोलीस यांना देण्याकरीता माझ्या ताब्यात दिली.पोनि आल्हाट यांनी सापळा कारवाई बाबत मला व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या.लोकसेवक गवांदे,पोलीस हे कोठे आहेत याची माहीती घेण्यासाठी त्यांना कॉल करण्याचे ठरले, त्याप्रमाणे मी माझा मोबाईल क्र. 9096552457 यावरून लोकसेवक गवांदे,पोलीस यांना त्यांचा मोबाईल क्र. 8459282870 याचेवर दुपारी 11/50 वा.कॉल केला असता लोकसेवक गवांदे,पोलीस यांनी फोन उचलला नाही त्यानंतर 11/52 वा.चे सुमारास लोकसेवक गवांदे,पोलीस याचा माझे वरील मोबाईल क्रमांकावर फोन आला त्यावेळी पोनि श्री.आल्हाट यांचे सुचनेवरून मोबाईल फोनचा स्पिकर फोन ऑन करून बोलणे केले असता ते कोठे आहेत याबाबत विचारले असता,त्यांनी भडांगे हॉटेलजवळ येण्यास सांगितले सदर फोन कॉलमधील संभाषण पोनि श्री.आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्डरड केले त्यानंतर भडांगे हॉटेलजवळ लोकसेवक गवांदे,पोलीस यांचे विरोधात सापळा आयोजित करण्याचे ठरले त्याप्रमाणे पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डरचालु करून कोणास दिसणार नाही अषा पध्दतीने माझ्या गळयात अडकवुन दिले.त्यानंतर मला,पंच क्र. 1 तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या व त्यानंतर मी सोबत पंच नं.1 असे माझ्याकडील चारचाकी वाहनाने 12/10 वा.चे सुमारास रवाना झालो व पोनि आल्हाट, पंच क्र. 2 व सापळा असे शासकीय वाहनाने आमचे मागोमाग आले,मी व पंच नं.1 असे भडांगे हॉटेलजवळ आल्यानंतर थांबलो.सापळा पथक आमचे पाठोपाठ आल्याची खात्री झाली.त्यावेळी मी लोकसेवक गवांदे,पोलीस यांना फोन करून भडांगे हॉटेलजवळ आल्याचे सांगितले त्यावेळी त्यांनी मला राहाता पोलीस स्टेषनमध्ये बोलावले त्याप्रमाणे मी वाहन राहाता पोलीस स्टेशनकडे घेवुन राहाता पोलीस स्टेषन समोर गाडी उभी करून पोनि श्री.आल्हाट व सापळा पथक येण्याची वाट पाहिली. पोनि श्री.आल्हाट व सापळा पथक राहाता पोलीस स्टेशनच्या आवारात आल्यानंतर मी पुन्हा लोकसेवक भडांगे,पोलीस यांना त्यांचे वरील मोबाईल क्रमांकावर फोन करून पोलीस स्टेशनमध्ये आल्याचे सांगितले त्यावेळी लोकसेवक गवांदे,पोलीस पोलीस स्टेशन मधुन बाहेर आले व त्यांचेसोबत चालत चालत मी व पंच नं.1 असे पंचायत समिती,राहाता गेटच्या बाहेर आलो व नवीन पोलीस स्टेषनचे बाधकाम चालु असलेल्या ठिकाणाचे समोर रस्त्यावर उभे राहुन बोलत असताना पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशामधील 15000/- रूपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन लोकसेवक गवांदे,पोलीस यांना देण्यासाठी त्याचेसमोर धरली असता, त्यावेळी लोकसेवक गवांदे,पोलीस यांनी मी त्यांचेसमोर धरलेली लाच रक्कम 15000/- रूपये त्यांचे डाव्या हाताने स्विकारली.त्यावेळी मी सापळा पथकास लोकसेवक गवांदे यांनी लाच स्वीकारल्याचा नियोजित इशारा केला.त्यावेळी पोनि आल्हाट, पंच क्र.2 व सापळा पथक तेथे आले व लोकसेवक गवांदे यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले व पंच नं.02 करवी लोकसेवक गवांदे,पोलीस यांनी स्विकारलेली लाच रक्कम त्यांचे हातामधुन हस्तगत केली.

त्यावेळी पोनि आल्हाट यांनी लोकसेवक गवांदे,पोलीस यांना त्यांचे नाव,गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अनिल रामनाथ गवांदे,वय-35 वर्शे,पोलीस शिपाई,बक्कल नंबर 811,रा.फ्लॅट नं.4,बागडे यांचे बिल्डिंग,चैदा चारी, बागडे वस्ती,राहाता,ता.राहाता,जि.अहिल्यानगर,मुळ रा.पोखरी हवेली,ता.संगमनेर,जि.अहिल्यानगर असे सांगितले. त्यानंतर मला पोनि आल्हाट यांनी शासकीय वाहनाचे पाठोपाठ येण्यास सांगितले त्याप्रमाणे पोनि श्री.आल्हाट व त्यांचे सोबत सापळा पथक,पंच व लोकसेवक गवांदे,पोलीस असे शासकिय वाहनाने व त्यांचे पाठोपाठ मी माझेकडील चारचाकी वाहनाने राहाता येथे सापळा कारवाईवेळी थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी आला.त्यावेळी पोनि श्री.आल्हाट यांनी शासकिय वाहनामध्ये काळया कपडयाचे सहायाने अंधार करून लोकसेवक गवांदे,पोलीस यांच्या तपासण्या केल्या. त्यानंतर पोनि श्री.आल्हाट यांनी मला शासकिय विश्रामगृह,शिर्डी येथे येण्यास सांगितले व पोनि आल्हाट व त्यांचे सापळा पथक पुढील कामकाज करणेकामी लोकसेवक गवांदे यांना घेवुन शासकीय विश्रामगृह,शिर्डी येथे गेले. मी त्यांचे मागोमाग माझ्या चारचाकी वाहनाने षासकीय विश्रामगृह,शिर्डी येथे आलो. त्याठिकाणी सापळा पथकाने त्यांचे पुढील कामकाज केले.

तरी दि.24/09/2025 रोजी 20/19 वा. ते 20/47 वा.च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी वेळी यातील लोकसेवक अनिल गवांदे,पोलीस यांनी पंचासमक्ष माझेकडील डंपर वाहनाने राहाता पोलीस स्टेषन हद्दिमध्ये खडी तसेच वाळुची वाहतुक करण्याकरीता तसेच डंपर वाहनावर कारवाई न करण्याकरीता स्वतःकरीता व पी आय साहेबांकरीता 20,000/- रूपये लाचेची मागणी करून त्यापैकी 15,000/- रूपये पहिल्या टप्प्यात स्विकारण्याचे मान्य केले व दिनांक 25/09/2025 रोजी 12/10 ते 12/30 वा.चे दरम्यान सापळा कारवाई वेळी सदरची लाच रक्कम 15,000/- रूपये लोकसेवक अनिल गवांदे यांनी पंचायत समिती,राहाता शेजारील नवीन पोलीस स्टेशनचे बांधकाम चालु असलेल्या ठिकाणी पंचायत समिती कडे जाणा-या रोडवर पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी अनिल रामनाथ गवांदे,वय-35 वर्शे,पोलीस शिपाई,बक्कल नंबर 811,रा.फ्लॅट नं.4,बागडे यांचे बिल्डिंग,चैदा चारी,बागडे वस्ती,राहाता,ता.राहाता,जि.अहिल्यानगर,मुळ रा.पोखरी हवेली,ता.संगमनेर,जि.अहिल्यानगर यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

NITIN SUKHDEV CHAVAN(I (Inspector)) / PCMH94255 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पो.ठा.अं.

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** NITIN SUKHDEV CHA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMH94255